# परिचय पत्र

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नांव | : | **सौ. मंगल शहा** |
| २. | जन्म दिनांक | : | **07 मे 1954** |
| ३. | वय | : | **72** |
| ४. | जन्मस्थळ | : | **बार्शी** |
| ५. | राष्ट्रीयत्व | : | **भारतीय** |
| ६. | शैक्षणिक अर्हता | : | **10** |
| ७. | सेवा | : | **समाजसेवा** |
| ८. | आवडीचे क्षेत्र | : | **समाजकार्य** |
| ९. | भौगोलिक कार्यक्षेत्र | : | **संपूर्ण महाराष्ट्र** |

गेली ५० वर्षे एच.आय.व्ही. बाधित बालकांचा आणि स्त्रियांना मायेने पोटाशी धरून मंगलताई शहा पंढरपूर जवळ 'पालवी' हा आधारवृक्ष मोठ्या हिमतीने चालवीत आहेत.

२४ वर्षांपूर्वी जेव्हा एच. आय. व्ही. बद्दल बोलणेही पाप समजत होते त्या काळात मंगलताई व त्यांची मुलगी डिंपल घाडगे या मायलेकींना एच.आय.व्ही/एड्सबाबत प्रबोधन करण्याकरिता एका खेडेगावांमध्ये गेल्या असता त्यांना गुरांच्या गोठ्यात टाकलेली दोन बालके नजरेस पडली. अंगावरती बोटभर चिंधी नाही, केसांच्या जटा झालेल्या, जखमांनी अंगे भरलेली. जनावरांचे आणि त्यांचे मलमूत्र एकत्र होते. नरक म्हणजे काय हे वेगळं सांगावं लागतच नव्हतं.आणि मग प्रबोधनाची जागा सक्रिय हातांनी घेतली. त्या एच.आय.व्ही. बाधित बालकांना स्वतःच्या घरी आणून त्यांचा सांभाळ करणे म्हणजे घरी आणि आजूबाजूला सुरुंग लावण्याचा प्रकार होता.

‘चमचमत्या आकाशात ताऱ्यासारखे मिरवायला सारेच उत्सुक असतात. पण फाटलेले आभाळ कोण डोक्यावर घेणार? हे फाटलेलं आभाळ डोक्यावर घेतलं. कारण एक अंदाजे आठ-दहा वर्षांची एच.आय.व्ही. बाधित बालिका पालवीमध्ये दाखल झाली. कमरेखालचा संपूर्ण भाग नासल्यासारखा होऊन जखमा झाल्या होत्या. कारण काय तर स्वतःच्या चुलतीने घरांमध्ये तिचा वावर नको म्हणून, दिवसभर झाडावर बसून ठेवायचे आणि रात्री अंगणातच झोपवायचे.’

अशा बालकांना पालवी येथे सांभाळले जाते, हे समजताच त्यांना पालवीत सोडण्याचा ओघ सुरू झाला. मग जवळच भाड्याने जागा घेतली. पण जागा मालकाने या बालकांसह तेथे राहण्यास मज्जाव केला. पाणी बंद केले मग घरून पाणी नेऊन संसार सुरू झाला. येणारी बालके जखमांनी लतपत असलेली, अर्धमेली असायची. सुरूवातीला डॉक्टर स्वतःच्या दवाखान्यात त्यांना घ्यायला उत्सुक नसायचे. मंगलताईंनी स्वतः ड्रेसिंग सहित औषधोपचार सुरू केले. मुलांची प्रतिकारशक्ती वाढावी म्हणून त्यांनी गोमूत्र, अग्नीहोत्र,गाईचे दूध ,उत्तम आहार यांचा वापर सुरू केला. स्वतःची गोशाळा सुरू केली. बालके निरोगी राहण्याकरिता योगोपचार सुरू केले.

या बालकांना इतर शाळेत प्रवेश नाकारल्यावर शासनदरबारी असंख्य हेलपाटे घालून स्वतःची स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळा सुरू केली. व्यायाम, शालेय शिक्षणाबरोबर इतर अनेक संस्कार मंगलताई बालकांवर अखंडपणे करीत आहेत. बालकांकरिता पुस्तकवाचन, प्रेरणादायी फिल्म दाखवणे, सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, विस्मृतीत गेलेले अनेक खेळ गाणी यांचा परिचय करून देणे. यासारख्या उपक्रमातून त्या मुलांना समृद्ध करत आहेत. या साऱ्या प्रवासात आतापर्यंत १०००+ जास्त बालकांनी पालवी मध्ये आसरा घेतला व सद्यस्थितीमध्ये पालवीची बालकांची संख्या 150 चे वर येऊन पोहोचली. रोज एक नवीन आव्हान, रोज एक नवीन जबाबदारी.

पालवी मधील एच.आय.व्ही.सह जगणाऱ्या बालकांची वयोमर्यादा योग्य उपचारांमुळे वाढलेली असून विविध संधीसाधू आजारांवर त्यांनी मात केली आहे. शिक्षण पूर्ण झालेल्यांना रोजगार प्राप्त झाला आहे. वयात आलेल्या, शिक्षण पूर्ण झालेल्याचे विवाह करून देण्याचे धाडस त्यांनी केले. या विवाहित दाम्पत्यांची अपत्ये पूर्णतः निरोगी आहेत. समाज त्यांना स्वीकारतो आहे.अंध , अपंग,मानसिक रुग्ण ,अत्याचार ग्रस्त महिला यांच्यासाठी हिरकणी प्रकल्प ,निराधार वृद्ध यांच्यासाठी पालवी आपण घर हे नवीन प्रकल्प सुरु आहेत. यामध्ये १००+ जास्त महिलांचे पुनर्वसन आणि ५० हुन अधिक माऊली म्हणजेच वृद्ध व्यक्तींचा सांभाळ केला जातो .
आज पालवीला मदत करणाऱ्या हातांमध्ये संवेदनशील व्यक्ती ,डॉक्टर, समुपदेशक, तरुण वर्ग अशा समाजातील सर्व घटकांचा समावेश आहे.

मंगलताई व सहकाऱ्यांनी या विशेष बालकांना आणि महिलांना टाकाऊतून टिकाऊ अशा पर्यावरणपुरक वस्तू निर्मितीचा उद्योग चालू करून त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये पर्सेस, गोधड्या, टोपल्या, पुष्पगुच्छ अशा ७०+ वस्तू मोठ्या प्रमाणात तयार होतात.
**याला आता बाजारपेठ हवी आहे.**

**पालवी संस्थेची स्थापना :-** सौ.मंगल ताई व सौ.डिंपल घाडगे यांनी पालवीची स्थापना 2001 मध्ये केली.प्रभा हिरा प्रतिष्ठान मार्फत 2001 पासून पालवी प्रकल्पाचे काम चालू झाले. एचआयव्ही सह जगणाऱ्या बालकांच्यासाठी कामाची सुरुवात झाली. सर्वात लहान बालक १ महिन्यापासून ते मोठे 25 वर्षांचे आहे.

**पालवी संस्थेची स्थापना करण्यामागे उद्देश :-** अक्षरशः गोठ्यात, स्मशानात सापडलेल्या 2 लेकरांना सांभाळण्याचे काम सुरू झाले आणि या बालकांना फक्त उपचार देऊन उपयोग नाही तर त्यांना सक्षम बनवणे सुशिक्षित होणे हे लक्षात घेऊन पालवीची स्थापना केली.25-30 वर्षांपूर्वी 'एचआयव्ही' अथवा 'एड्स' हे शब्द कानावर पडले तरी लोक नाक मुरडत असत.अनेक गैरसमज असत.सामाजिक कलंक म्हणूनच याकडे पाहिलं जायचं.एचआयव्ही बाधित लोकांच्या वाट्याला अपेक्षा, घृणा आणि किळसच यायची.पण

त्याशिवाय संसर्गित व्यक्तीचं आरोग्य, आहार, शिक्षण, त्यांना सामाजिक व मानसिक पाठींबा देणं, स्वावलंबी बनवणं जास्त गरजेचं आहे.

**पालवी संस्थेचे सुरू असलेले उपक्रम :-** सद्यस्थितीमध्ये बालकांचा आहार, निवास, वैद्यकीय उपचार, शिक्षण, स्वावलंबन हे उपक्रम राबवले जातात.संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे.प्रभा - हिरा प्रतिष्ठानच्या माध्यमातून आज जवळपास नऊ वेगवेगळे प्रकल्प चालवले जातात.एचआयव्हीग्रस्त बालकांच्या संगोपनापासून सुरू झालेल्या या संस्थेच्या फांद्या दाही दिशांना वाढतायत आणि मुळे खोलवर रुजत चालली आहेत.मंगलताई शहा यांच्या निर्व्याज प्रेमाचे आणि असीम निष्ठेचे आणि डिंपल घाडगेच्या अथक मेहनतीचे हे प्रतिबिंब आहे.आतापर्यंत साधारण 500 बालकांच्या पर्यंत आपण पोहोचलो आहोत.प्रोजेक्ट स्वयंसहायता या प्रकल्पांतर्गत बालकांना व महिलांना स्वावलंबी बनवणे करिता शिलाई काम, शेती काम, प्लंबिंग, कागद काम इत्यादी शिकवले जाते. गोधडी बनवणे आणि त्यांनी बनवलेल्या 70+ वस्तूंनापालवी मार्केट मिळवून देते.

1.पालवी संगोपन प्रकल्प

2.पालवी ज्ञानमंदिर प्रकल्प

3.पालवी Creations (सेल्फ रिलायन्स प्रोजेक्ट)

4.पालवी श्री नैवैद्यम सेवा प्रकल्प

5. प.पू.विश्वकल्याण विजयजी महाराज गोशाळा प्रकल्प

6. पालवी हिरकणी प्रकल्प

7. पालवी परिस्पर्श प्रकल्प

8. पालवी अपना घर प्रकल्प

9. पालवी संजीवनी वैद्यकीय उपचार केंद्र

10.**‘आम्ही प्रकाश बीजे’** या पालवीतील 70 बालकांचा नृत्य-संगीतात्मक व्यावसायिक कार्यक्रमाचे महाराष्ट्रातून कौतुक होत आहे.

**आतापर्यंत संस्था 500+ जास्त लाभार्थी पर्यंत पोहोचली आहे.वीस वर्षांपूर्वी दोन बालकांवर सुरू झालेल्या या प्रकल्पात आज 150 HIV+ बालकांचं जणू गोकुळ झालेलं आहे.केवळ एचआयव्हीग्रस्त बालकेच नव्हे तर एचआयव्हीग्रस्त तरुण मुले, महिला अशा सगळ्यांसाठी "पालवी" प्रकल्प म्हणजे हक्काचे, मायेचे आणि सुरक्षित ठिकाण झाले आहे.**

**आज पालवीच्या कार्याचा विस्तार आणि प्रचार होणे अत्यंत गरजेचे आहे .**

१०० हुन अधिक पुरस्कार मंगलताई यांना त्यांच्या कार्यानिमित्त देण्यात आलेलं आहेत. त्यातील मोजके खालीलपैकी :

**1. कृत्यता पुरस्कार 1993**
**2. शोभाताई सोपल पुरस्कार 2004**
**3. आद्य महिला पुरस्कार 2005**
**4. एड्स जनजागृती पुरस्कार 2006**
**5. ब्रम्हदेव माने प्रतिष्ठान पुरस्कार**
**6. जैन सोशल ग्रुप पुरस्कार 2006**
**7. भारतीय जैन संघटना पुरस्कार 2006**
**8. आनंदी गणेश सेवाभावी संस्था अकलूज पुरस्कार**
**9. माळवे सामाजिक संस्था पुरस्कार 2007**
**10. लायन्स महिला रत्न पुरस्कार 2008**
**11. सखी रत्न पुरस्कार 2008**
**12. समाजभूषण वीरश्री पुरस्कार 2009**
**13. स्व. वसंतदादा काळे प्रतिष्ठान समाज भूषण पुरस्कार 2009**
**14. सूर्यकांत पवार फाउंडेशन पुणे पुरस्कार 2010**
**15. आदर्श माता पुरस्कार, मुंबई 2011**
**16. प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर 2012**
**17. रावसाहेब पटवर्धन मातृ कृत्यज्ञता 2012**
**18. जीवन गौरव 2012 जैन सोशल ग्रुप फलटण**
**19. सूर्योदय गौरव 2012**
**20. मानव्य कर्मयोगिनी पुणे 2013**
**21. कन्या महाराष्ट्र ची 2013**
**22. आदर्श माता, रोटरी क्लब सांगली 2013**
**23. विश्वमाता, विश्व फाउंडेशन शिवपुरी अक्कलकोट 2014**
**24. जीवन गौरव, सोलापूर 2014**
**25. राजमाता जिजाऊ पुरस्कार, पिंपरी पुणे 12-01-2020**
**२६ शांतिरत्न बालगंधर्व येथे शांतीदूत परिवार, पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेला पुरस्कार.**
**27.श्रीमती गिरिजा एकनाथ ठुसे सेवाव्रती पुरस्कार 2020 ठाणे येथे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक व कवी प्रवीण दवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**
**28.लोकसत्ता दुर्गा पुरस्कार. लोकसत्ता हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध वृत्तपत्र आहे.**